**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)**
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

# प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या स्व-जाणीवाचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. सुनिल परशराम पाटील**

**सहयोगी प्राध्यापक**

*डी.ई.सो.चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.*

**सारांश -** प्रस्तुत संशोधन पेपरात प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या स्व-जाणीवाचा तुलनात्मक अभ्यास हा वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीने केला आहे. सहेतुक नमुना निवड पद्धतीने १०० शिक्षकांची, निवड संशोधनासाठी केली होती. माहितीचे संकलन करण्यासाठी स्व-जाणीवाचा चाचणीचा अवलंब केला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण व अनव्यार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करून पुढील निष्कर्ष प्राप्त झालेले आहे- शहरी शिक्षकांची स्व-जाणीव ग्रामीण शिक्षकांच्या स्व-जाणीवापेक्षा अधिक आहे. स्त्री शिक्षकांची स्व-जाणीव पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवपेक्षा अधिक आहे

**प्रस्तावना-**

सद्या शाळेतील शिक्षकांकडे अनेक अशैक्षणिक कार्य वाढली आहेत, दैनंदिन जीवनात अनेक प्रकारचे तणाव निर्माण झाले आहेत. आर्थिक, सामाजिक जबाबदारी सांभाळतांना अनेक निर्णय घेतांना शिक्षकांवर तणाव निर्माण होतो आणि त्याचा प्रतिकुल परिणाम अध्यापनावर होण्याची शक्यता असते. अशा वेळेस शिक्षकांला आपल्या कौशल्यांना सांभाळून विदयार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करायच्या असतात.धावपळीच्या जीवनात शिक्षकांना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते, अशा वेळेस शिक्षकांने आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते.

शिक्षकांना स्वत: विषयी असलेली जाणीव ही स्वत:चे परीक्षण करण्यासाठी सक्षम असते आणि तो व्यक्ती आत्मविश्वासाने परिपूर्ण असतो. असा शिक्षक हा विद्यार्थ्यांनाही स्वावलंबी बनविण्यासाठी सक्षम असतो. आजच्या हया धावपळीच्या युगात प्राथमिक शिक्षणापासून तर उच्चशिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना घडविण्यासाठीचे प्रयत्न केले जातात त्या प्रयत्नांमध्ये शिक्षकांस महत्त्वाचे स्थान असते. केवळ शिक्षक म्हणून मी नौकरीला आहे मला पगार मिळतो म्हणून मी काम करतो यापलीकडे विचार

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
EduIndex Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

करणारा शिक्षकच सक्षम व निर्णय घेण्याची कुवत ठेवीत असतो यासाठी स्व जाणीव प्रत्येक शिक्षकाची आणि व्यक्तीची विकसीत होणे महत्त्वाचे आहे.

म्हणून ही सर्व प्रकारची कार्य व्यवस्थितपणे पूर्ण करण्यासाठी शिक्षकांमध्ये स्व-जाणीव हा गुण असणे आवश्यक आहे. प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसदर्भात संशोधकाने स्व-जाणीवाचा अभ्यास केला असून स्त्री व पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवात फरक असतो का? हे संशोधन कार्य हाती घेतले आहे.

**समस्या विधान-** नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांमधील स्व-जाणीवाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्ट**

१. प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षकांमधील स्व-जाणीवाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. प्राथमिक शाळांमधील स्त्री व पुरूष शिक्षकांमधील स्व-जाणीवाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना**

**१.** प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीवाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**२.** प्राथमिक शाळांमधील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**पद्धती-**प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीव जाणुन घ्यावयाची असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनातील नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षक हे संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित केले होते. सहेतूक नमुना निवड पद्धतीने एकूण १०० शिक्षकांची निवड संशोधनासाठी केली होती.

**संशोधन साधने-** प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या स्व-जाणीवाचा चाचणीचा अवलंब केला आहे.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**माहिती विश्लेषण व अन्वयार्थ-** प्रस्तुत संशोधन कार्यात दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण केल्यानंतर पुढील प्रमाणे शून्य परिकल्पनाचे परिक्षण केले होते ते पुढील प्रमाणे..

**परिकल्पना परीक्षण १**

**प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीवाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०१ प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीवाचे मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य.**

| प्राथमिक शाळांमधील शिक्षक | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५० | १४५.१८ | ९.२६ | १.९९ | ४.५२ | त्याग |
| शहरी | ५० | १६५.६४ | १०.४९ | | | |

**तक्ता क्र. ०१** नूसार df = ९८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९९ आहे व प्राप्त 't' मूल्य ४.५२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.यावरून असे म्हणता येईल की, प्राथमिक शाळांमधील ग्रामीण व शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीवाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीवाचे मध्यमान १६५.६४ हे ग्रामीण शिक्षकांच्या स्व-जाणीवाच्या मध्यमानापेक्षा (१४५.१८) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, शहरी शिक्षकांच्या स्व-जाणीव ग्रामीण शिक्षकांच्या स्व-जाणीवपेक्षा अधिक आहे.

**परिकल्पना ०२: प्राथमिक शाळांमधील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०२ प्राथमिक शाळांमधील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवाचे मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य.**

| प्राथमिक शाळांमधील | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | ५० | १५८.५८ | ९.१६ | १.९९ | ४.५६ | त्याग |
| पुरूष | ५० | १०८.१४ | ११.२३ | | | |

**तक्ता क्र. ०२** नूसार df = ९८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९९ आहे व प्राप्त 't' मूल्य ४.५६असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.यावरून असे म्हणता येईल की, प्राथमिक शाळांमधील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवाच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. स्त्री शिक्षकांच्या स्व-जाणीवाचे मध्यमान १५८.५८ हे पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवाच्या मध्यमानापेक्षा (१०८.१४) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, स्त्री शिक्षकांच्या स्व-जाणीव पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवपेक्षा अधिक आहे.

**निष्कर्ष**

१. शहरी शिक्षकांची स्व-जाणीव ग्रामीण शिक्षकांच्या स्व-जाणीवपेक्षा अधिक आहे.

२. स्त्री शिक्षकांची स्व-जाणीव पुरूष शिक्षकांच्या स्व-जाणीवपेक्षा अधिक आहे.

**संदर्भसूची**

कदम, चा. प. (१९८९). शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणे, नुतन प्रकाशन.

भिंतांडे, वि.रा. (१९९९). शैक्षणिक संशोधन पद्धती: (तिसरी आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे रा.श. आणि उमाठे वि. तु. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (द्वितीय आवृत्ती). औरंगाबाद: विद्या प्रकाशन.

पंडीत बन्सी बिहारी व लता सुरवाड. (२००५). शिक्षकांच्या संगणक साक्षरताचा अभ्यास, शिक्षण समिक्षा (ऑक्टो-नोव्हें २००५).

पंडीत, बन्सी बिहारी. (२००५). शिक्षणातील संशोधन. पुणे: नित्य नूतन प्रकाशन.

कुलकर्णी, डी. आर. (२००८). *प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र (प्रथम आवृत्ती)*. नागपूर: विद्या प्रकाशन.